८ जून २०२१

- कार्य - कारण - अध्याय १५वा (भगवद्गीता)

श्वेतकेतुचा प्रश्न – कस्मिन्नु भगवो विज्ञाते
सर्वमिदं विज्ञातं भवति।
मुंडक उपनिषद

१. जिथे जिथे कार्य आहे तिथे तिथे कारण आहेच.
कारणं विना कार्यं न सिध्यति।
कारण दिसले नाही तरी ते असतेच. अनुमान करता येते.
गवत, May flower. अलंकार, घट — कार्य
बी बी सोने माती — कारण

२. कार्य निर्माण होण्यापूर्वी कार्याचा अभाव असला तरी
कारण अस्तित्वात असतेच. ते बीजरूपाने अव्यक्त असते.
करी सुरवंटवाद जो कुणाच्या/जगी धन्य हो - - -

3. कार्याला स्वतःची सत्ता / अस्तित्व नसते. त्याला
आधाराची / अधिष्ठानाची आवश्यकता असते.
इमारतीचा पाया इमारतीला अस्तित्व देतो.
माती घटाला, सोने मातीला सत्ता देते.
कार्य हे कारणावर अवलंबून असले तरी
कारणाला मात्र कार्याची गरज असतेच असे नाही
जिथे कार्य आहे तिथे कारण अनुस्यूत आहेच.

४. एका बीजातून हे विविधरंगी नानात्वाने नटलेले विश्व
निर्माण झाले. - - - आधी बीज एकले।
बीज अंकुरले रोप वाढले - - - वृक्ष - अनेक फांद्या
हा भवक्रम विस्तारलेला वृक्ष कायमचा आहे असे वाटते
परंतु तो तसा नाही. त्यालाही नाश आहे. आणि जर
मुळापर्यंत जायचे असल्यास तर जाता येते. त्यासाठी हा तोडून
टाकायला हवा. पुरुषार्थाने आणि प्रयत्नाने त्याचा नाश करता
येतो. वरवर फांद्या काढून किंवा अगदी बुंधा काढून चालणार
नाही. तर त्याच्या मुळापर्यंत जायला हवे.
म्हणूनच कार्याकडून कारणाकडे जायला हवे
कारणनाशात् कार्यनाशः
श्वो न तिष्ठति इति अश्वत्थः।
संसारवृक्ष असाच आहे. त्याचे मूळ वरती आणि पसारा
खाली आहे.

विश्व— विविधप्रत्ययगोचरं ~~वृक्ष~~ विश्वम्।

नानात्व, अनेकत्व, विविधत्व

चेतन —— अचेतन —— दृश्य, सगुण, साकार

जे जे दिसते ते ते सर्व कार्य आहे.

सूर्य, चंद्र, ग्रह, तारे, आकाशगंगा, निसर्ग- - - -

'मी' देखील कार्यच आहे.

हे विश्व जर कार्य असेल तर त्यामागे कारण आहेच.

विश्वनिर्मितीच्या मागे कारण आहेच.

मी आईवडीलांशिवाय जन्माला आलो नाही

मातीशिवाय घट नाही. / अलंकार- सोने.

विश्वनिर्मितीपूर्वी काहीही नव्हते. या साकार अवस्थेमध्ये तर नव्हतेच. परंतु बीजरूपाने होते.

वृक्ष निर्माण होण्यापूर्वी बीजावस्था असतेच. ती अव्यक्त अवस्था आहे. त्या अव्यक्तातूनच या व्यक्त विश्वाची निर्मिती झाली.

वटबीजाच्या आतमध्ये काहीही दिसत नाही. पण तिथेच या वृक्षाचा विस्तार अदृश्य स्वरूपात असतो.

विश्वाचे कारण हे विश्वाच्या वरती म्हणजे पलीकडे आहे. ते खाली नाही. कारण पृथ्वी स्थूल आहे. मर्यादित आहे. तिला वजन आहे. आकाश मात्र Infinite आहे. सूक्ष्म आहे. तरल आहे.

अणुरेणियां थोकडा, तुका आकाशाएवढा।

विश्वाला मर्यादा आहेत. Space, time, Objectwise limitations आहेत. ते सापेक्ष आहे.

मात्र विश्वाचे कारण या सर्वांच्या अतीत आहे. इथे ऊर्ध्व म्हणजे केवळ वरती नाही तर पलीकडे असणारी वस्तु निर्देशित करतो विश्वाचे कारण मर्यादेपलीकडे आहे. त्याला देशकाल वस्तु परिच्छिन्नता नाही.

ते निरतिशय Absolute आहे.

घटाच्या सापेक्षतेने माती अमर्याद आहे. अविनाशी आहे. तसेच विश्वाचा विचार करायला लागलो तर विश्वाचे कारण अमर्याद, सर्वव्यापी आहे.

© www.madhaveeraghuveer.com

काळाच्या अतीत असल्याने जन्ममृत्युरहित, अविनाशी, शाश्वत, नित्य, अविकारी आहे. विश्वातील सर्व स्थूल सूक्ष्म वस्तूंना अंतर्बाह्य व्यापून राहणारे, सर्वांचे अधिष्ठानभूत असणारे असे ते अंतःपूर्ण: बाह्यपूर्ण: असे आहे. ते अखंड आहे. वर्तुळ आहे. मंडलाकार आहे.

अखण्डं मण्डलाकारं व्याप्तं येन चराचरम्
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्री गुरवे नमः॥

संपूर्ण विश्वाचा प्रलय झाला नाही तर नामरूपरहित होऊन बीजरूपाने अव्यक्तावस्थेत असते.

जागृत अवस्थेत - विश्व भेदरूपाने दिसते.

अंधार पडल्यावर — अंधारात अंतर्धान: सामावणारी

सुषुप्ति अवस्थेत - सर्व अनुभव लुप्त होतात.

'मी न भासे' सर्व नाहीसे होते.

अर्थात विश्वाचा नाश होत नाही. मी जागे झाल्यावर कालचाच मी माझ्याच घरात आढळतो. मी पुन्हा जागा होतो. व नित्य व्यवहार करायला लागतो.

मात्र हे अज्ञानात घडत असते. हाच साक्षात्कार ज्ञानावस्थेत घडणे म्हणजेच आत्मज्ञान आहे.

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना॥

© www.madhaveeraguveer.com